# मराठी (आंतरभारती)

## उत्तरे : सराव कृतिपत्रिका 4 थी

### विभाग 1 : गद्य

**प्र. 1. (अ)**

**(1)** **(i)** (1) भारतीय लोक पोर्ट लुईच्या बंदरात उतरले.

(2) मॉरिशस हा संस्कृतीचा मेल्टिंग पॉट झाला.

**(ii)** (1) पोर्ट लुई (2) कुली घाट

**(2)** मॉरिशस हे दर्यातील एक सुंदर साखरबेट आहे. चोहीकडे उसाचे हिरवे मळे आहेत. निळ्या पाण्याच्या समुद्राने ते वेढले आहे. मॉरिशसमधील घरे होडीच्या आकाराची आहेत. भारतीय घरांपुढे गर्द हिरव्या पानांनी सुशोभित झालेली पिवळ्या केळ्यांची बाग आहे. घराच्या भिंतींना पांढरा रंग आहे. वर हिरवी, निळी, लाल छपरे आहेत. घरापुढे सुंदर फुलझाडांचे रंगीबेरंगी परसू (परसदार) आहे. त्या परसूत निळ्या पाण्याचे तळे व तळ्यात लाल-निळी कमळे फुललेली असतात. हा सर्व रंगांचा बहर पाहिला की असे म्हणावेसे वाटते की, मॉरिशसला बहुरंगी निसर्गसौंदर्य लाभले आहे.

**प्र. 1. (आ)**

**(1)** **पालकांनी मुलांसाठी आणलेल्या कोणत्याही दोन गोष्टी** → नवीन बूट
→ शर्ट

**(2)** (i) शाळाशाळातून मैदानावर धावण्याच्या स्पर्धेत भाग घेण्यासाठी येणाऱ्या मुलांची झुंबड होती.

(ii) मुलांना प्रोत्साहन देण्यासाठी पालक आले होते.

**(3)** (i) त्याचे आईवडील (ii) मैदानावर मुले धावायला लागतात

### विभाग 2 : पद्य

**प्र. 2. (अ)**

**(1)** (i) धनधान्य पिकल्यावर आनंदित झालेला शेतकरी म्हणतो – या शेतातल्या काळ्या मातीतून हिरवी रोपे वर आली आहेत. त्यांचा हिरवा सुगंध वाऱ्यावर दरवळतो आहे.

(ii) सुगी आले. शेत फुलून आले. धान्याची दौलत शेतकऱ्याला मिळाली. म्हणून तो आनंदाने म्हणतो – आम्हीच आमचे मालक आणि आम्ही राजे आहोत. आमचीच सत्ता आहे.

**(2)** शेतकरी शेतात राबले. त्यांनी त्यांच्या दोन हातांनी कष्ट केले. त्यामुळे चमत्कार झाला. सर्वत्र धान्य बहरले. त्यांच्या सोबतीला खिल्लारी धष्टपुष्ट बैलांची जोडी होती, म्हणून ही किमया झाली.

**प्र. 2. (आ)**

**(1)** (i) **सुगरणीच्या खोप्याला कवयित्रीने दिलेल्या उपमा** → झुलता बंगला
→ गिलक्याचा खोपा

(ii) सुगरणीकडून माणसाने घ्यावयाचे दोन गुण → सौंदर्य, माया
→ कष्टाळूपणा

**(2)** सुगरणीची आपल्या पिल्लांवर गाढ माया आहे. पिल्लांना झुलवून झोपण्यासाठी तिने सुंदर विणलेला खोपा (घरटे) झाडाला टांगला आहे.

## विभाग 3 : भाषाभ्यास

**प्र. 3. (अ)**

**(1)** (i) सुगीचा मोसम आला. (ii) भूतकाळ

**(2)** (i) सदूला नोकरी लागताच काकांनी हात आखडता घेतला.

(ii) सायली निघून गेल्यामुळे आईचे बोलणे खुंटले.

**प्र. 3. (आ)**

**(1)** **(i)** (1) झाड = वृक्ष (2) फूल = पुष्प

**(ii)** सुगरण ⟶ गर | गण

**(2)** निबंध

**(3)** (i) ‘ ’ ⟶ एकेरी अवतरण चिन्ह (ii) - ⟶ संयोग चिन्ह

## विभाग 4 : उपयोजित लेखन

**उपयोजित लेखनातील कृतींच्या स्वयं-मूल्यमापनाबाबत...**

उपयोजित लेखनाच्या कृतींमध्ये विद्यार्थ्यांनी उत्तर लिहिताना स्वत:चे विचार, स्वत:च्या कल्पना स्वभाषेत लिहाव्यात, अशी अपेक्षा आहे. या कृतींची उत्तरे मुक्तोत्तरी स्वरूपाची असतात. विद्यार्थ्यांनी ही उत्तरे स्वत: लिहावीत.

या विषयातील सोडवून दिलेल्या पहिल्या कृतिपत्रिकेतील उपयोजित लेखनामधील कृतींची उत्तरे विद्यार्थ्यांनी अभ्यासावीत; गुणदान-पद्धतीतील मुद्दे विचारात घ्यावेत आणि स्वत: लिहिलेले उत्तर स्वत:च तपासण्याचा प्रयत्न करावा. गरजेनुसार आपल्या शिक्षकांचे मार्गदर्शनही घ्यावे.

***उपयोजित लेखनाच्या अधिक अभ्यासासाठी***

***‘नवनीत मराठी (LL) उपयोजित लेखन : इयत्ता दहावी’***

***या पुस्तकात दिलेले उपयोजित लेखनाचे नमुने अवश्य वाचावेत.***